# पंचावन्न देगा देवा

‘पंचावन्न देगा देवा’ – न्यूजर्सी तील Club 55 व मराठी विश्व ह्यांनी चार एप्रिल रोजी एकत्रित आयोजित केलेल्या कार्यकमाच हे शीर्षक. Club 55 च्या आयोजकांनी Dr. Deven Gabale ह्यांना Urological problems associated with aging अश्या संकुचित आणी म्हणून ‘गंभीर’, विषयावर प्रेक्षकांना माहीती देण्याची विनंती केली होती. Urology सारखा विषय त्यामूळे खर तर Club 55 च्या आयोजकांना भिती ही होती की आपल्या लोकांना हया विषयावरची चर्चा कितपत रूचेल. आपण सर्वच एकमेकांना ओळखणारे त्यामूळे प्रश्न विचारण तर सोडाच – पण ही माहीती ऐकायलाही संकोच वाटेल का ही धास्ती होती. पण झालं उलटच !!

कार्यक्रम सूरू झाल्यावर प्रेक्षकांच्या लक्षांत आलं की Dr. Deven Gabale ह्यांनी आपली डॉक्टरी टोपी थोडी तिरकी करून, कलाकाराच्या टोपीला जास्त जागा करून दिली होती. ह्या कार्यक्रमाविषयी लिहायच तर मला आता Dr. Deven Gabale मधला ’Dr.’ व अहो–जाहो चा औपचारिकपणा बाजूला सारावा लागेल.

देवेनने कार्यक्रमाच्या नावातच थोडा बदल केला – ‘पंचावन्न देगा देवा, मला एक Urologist हवा’ व मिश्किलपणे, हसतखेळत हया अवघड आणी वैयक्तिक विषयावर लोकांना मोकळेपणे ऐकता_बोलता याव अशी भाषणशैली वापरली. अज्ञानामुळे किंवा लाजेमुळे किंवा ‘वयोपरत्वे असं व्हायचचं’ हया कल्पनेमुळे काही काही व्याधींवर medical/urological advice घेतला जात नाही. तर तस होऊ नये म्हणून काय करता येईल हे मजेदारपणे प्रेक्षकांना समजावल व Urology related विनोदी उखाणे, आरत्या, म्हणी हया सर्व माध्यमातून प्रेक्षकांची भरपूर करमणूक केली.

देवेनच्याच भाषेत सांगायच तर हा विषय ‘below the belt’ त्यामुळे बरेच जण होण्याऱ्या त्रासाकडे दुर्लक्ष करतात किंवा Urologist जाण्याचे टाळतात. Prostrate problems, Cancer, Incontinence, Erectile Dysfunction, hormonal imbalance, sex after 55, अश्या एकापेक्षा एक कठीण ‘विषयाना’ हाताळत देवेनने तास–दीड तास सर्वांचे मनोरंजन केले. मला तरी कोणी संकोचलेली व्यक्ति नजरेला आली नाही. सगळे मनमुराद हसत होते !

जी मंडळी अजून ’55 minus’ आहेत म्हणून कार्यक्रमाला येऊ शकली नाहीत आणी जी मंडळी ‘55 plus’ असूनही हजर राहू शकली नाहीत, त्या सर्वांनाच एक करमणूकप्रधान आणी तरीही माहीतीपूर्वक असा एक छान कार्यक्रम चुकला.

Club 55 तर्फे देवेनचे आभार मानण औपचारिक वाटत पण – Dr. Deven Gabale – Thank you for entertaining us all and making the afternoon very enjoyable!!!